# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/05/2023 (बुधवार) दुपार


## अवैध रेतीची (गौणखनिज) चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमांविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ४०,५४०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची धडक कारवाई

दिनांक ०३/०५/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत बायपास चौक उमरेड रोड येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक टिप्पर वाहनाने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून बायपास चौक उमरेड रोड येथे सापळा रचुन टिप्पर क्र. १) एम. एच—४९ ए.टी.— ७२२२ मध्ये परवाना क्षमतेपेक्षा जास्त ०३ ब्रास रेती किंमती अंदाजे १८,०००/—रू. २) एम. एच—४९ ए. टी.—९२६६ च्या डाल्यात ०६ ब्रास विनापरवाना रेती किंमती ३६,०००/—रू. ची विना परवाना (रॉयल्टी) आपल्या ताब्यातील टिप्परमध्ये (गौणखनिज) रेती भरून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने दोन्ही टिप्पर एकुण किंमती अंदाजे ४०,००,०००/—रू. मध्ये व दोन्ही टिप्पर मधील एकुण ०९ ब्रास रेती किंमती अंदाजे ५४०००/—रूपयाचा मुद्देमाल असा एकुण ४०,५४,०००/— रूपयाचा मिळुन आल्याने पोलीस स्टेशन उमरेड येथे टिप्पर चालक **क्र. १) असीन खान वल्द अब्बास खान, वय २५ वर्ष, रा. गरीब नवाज चौक खरबी नागपूर २) संदीप राजेश गुप्ता वय २६ वर्ष, रा. सेनापती नगर प्लॉट क्र. ३८ दिघोरी उमरेड रोड नागपूर** सदर दोन्ही वाहन चालक/मालक यांचेविरूद्ध मा. तहसिलदार तहसिल कार्यालय उमरेड यांचे कडुन दंडात्मक कारवाई करवुन घेणेकरीता पोलीस स्टेशन उमरेड येथे डिटेन करण्यात आले असुन मा. तहसिलदार उमरेड यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा. श्री. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार अरविंद भगत, पोलीस नायक बालाजी साखरे, अजीज शेख, मयुर ढेकळे, रोहन डाखोरे यांचे पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर